प्रेस नोट                                    दिनांक :- २४/०८/२०२६

**एम.डी. (मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ जवळ बाळगणाऱ्या तडीपार इसमास ताब्यात घेवून गुन्हा नोंद करण्यात आले बाबत..**

दिनांक २३/०८/२०२६ रोजी पहाटे ०५.३० वा. चे सुमारास पवई पोलीस ठाणेचे सपोनि अण्णा ठोंबरे , पोउपनि संदीप पाटील, पोउपनि प्रकाश वाखारे, पोशिक्र. ००३०४/सौदाणे, पोशिक्र. १५०९२३/रणजित सातपुते, पोशिक्र. ०९०८३५/अलीम मुलाणी, व पोशिक्र १३००६२/शिंदे असे पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असताना रूम नं ५०७ समोर, मोमीन चाळ, गुप्ता कॉर्नर जवळ, मोरारजीनगर, मिठी नदी नाल्याजवळ आरे रोड, पवई, मुंबई येथे पवई पोलीस ठाणे अभिलेखावरील तडीपार इसम नामे मुबारक उर्फ लालु हा त्याचे वर नमुद राहत्या घराजवळ मिळून आला. सदरवेळी त्याची हालचाल संशयास्पद वाटत होती. तसेच तो इकडे तिकडे पाहून कोणाचीतरी वाट पाहत असल्याचे जाणवल्याने त्याच्यावर संशय बळावला. त्यामुळे पोलीस पथक त्या इसमाजवळ गेले असता तो तेथून निघून जाण्याच्या तयारीत असतानात पोलीस पथकाने त्यास ताब्यात घेवून विचारणा केली असता त्याने त्याचे नाव मुबारक मोमीन खान उर्फ लालू वय ३२ वर्षे, रा.ठि. रूम नं ५०७ समोर, मोमीन चाळ, गुप्ता कॉर्नर जवळ, मोरारजीनगर, मिठी नदी नाल्याजवळ आरे रोड, पवई, मुंबई असे सांगितले. सदर इसमास पोउपनि वाखारे यांनी तिथून पळून जाण्याचे कारण विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. नमुद वेळी रात्रपाळी पर्यवेक्षक पोनि. चव्हाण यांनी माहिती देवून मा. वरिष्ठांच्या परवानगीने नमुद संशयित इसमाची एन.डी.पी.एस. कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करून अंगझडती घेण्यात आली असता त्याच्याकडे खालील नमुद प्रमाणे चिजवस्तू मिळून आल्या.

**१) प्लास्टिकच्या पारदर्शक पिशवीमध्ये एकुण ५५.१ ग्रॅम 'एम डी' (मॅफेड्रॉन) अंदाजे किंमत रू. ८,८०,०००/-**

**२) रोख रक्कम रू. ४७,८५०/-**

**३) सॅमसंग कंपनीचा गॅलेक्सी ए १४ कंपनीचा सिल्वर रंगाचा मोबाईल अंदाजे किंमत रू. १०,०००/-**

**मुद्देमालाची एकुण किंमत रू. ९,३७,८५०/-**

नमुद ताब्यात घेण्यात आलेला इसम नामे मुबारक मोमीन खान उर्फ लालू याच्या विरोधात पवई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९०६/२०२६ कलम ८(क) सह २२(क) एन.डी.पी.एस.ॲक्ट सह १४२ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद गुन्हयामध्ये त्याच्या वापरते मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करून गुन्हयाचा पुढील तपास करण्यात येत आहे.

**नमुद अटक करण्यात आलेला आरोपीत हा मुंबई शहर व मुंबई उपनगर येथून तडीपार करण्यात आलेले असून नमुद अटक इसमाविरोधात विविध पोलीस ठाणेस एकुण १० गुन्हयांची नोंद आढळून आलेली आहे.**

सदरची कामगिरी मा.श्री. देवेन भारती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री. मनोजकुमार शर्मा पोलीस सह आयुक्त (का व सु) बृहन्मुंबई, मा.श्री. अभिनव देशमुख अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री. दत्ता नलावडे पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ - ३, मा.श्री. दादासाहेब घुटुकडे सहाय्यक पोलीस आयुक्त, साकिनाका विभाग व मा. श्री. आत्माजी सावंत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पवई पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. संदिप चव्हाण, सपोनि अण्णा ठोंबरे , पोउपनि संदीप पाटील, पोउपनि प्रकाश वाखारे तसेच पोशिक्र. ००३०४/सौदाणे, पोशिक्र. १५०९२३/रणजित सातपुते, पोशिक्र. ०९०८३५/अलीम मुलाणी, व पोशिक्र १३००६२/शिंदे यांनी पार पाडली आहे.